जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५३०   दिनांक - ११/०७/२०२३**

**खंडणी विरोधी पथक १,गुन्हे शाखा,पुणे शहर**

# मा.मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ व मा.मंत्री महोदय श्री.धनंजय मुंडे यांना धमकी देणा-या इसमास घेतले ताब्यात

दि.१०/०७/२०२३ रोजी मा.मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ हे पुणे दौ-यावर असताना एका इसमाने त्यांना फोनद्वारे जीवे ठार मारण्यासाठी सुपारी घेतली असल्याबाबत धमकी प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.सदर गुन्हयाचा समांतर तपास खंडणी विरोधी पथक १,गुन्हे शाखा, पुणे शहर हे करत असताना,खंडणी विरोधी पथक १ चे प्रभारी पोलीस निरीक्षक अजय वाघमारे यांना सदरचा इसम हा महाड,जि.रायगड येथे असल्याबाबत माहिती मिळाली. मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे पुणे शहर यांच्या परवानगीने खंडणी विरोधी पथक १ कडील पोउनि/ विकास जाधव, पोलीस हवालदार संजय भापकर,सयाजी चव्हाण व पोलीस नाईक राजेंद्र लांडगे हे महाड,जि.रायगड येथे रवाना झाले.

खंडणी विरोधी पथक १ गुन्हे शाखा,पुणे शहर,स्था.गु.शा.व महाड पोलीस स्टेशन,जिल्हा रायगड यांनी संयुक्त कारवाई करून महाड येथील दत्त भुवन लॉज मधून धमकी देणारा इसम नामे **प्रशांत दशरथ पाटील,वय २४ वर्षे,रा.मु.कडलगे खुर्द,पो.ढोलगरवाडी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर** यास ताब्यात घेवून चौकशी केली असता त्यानेच मा.मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे कबुल केले.त्याप्रमाणे त्याने मा.मंत्री महोदय श्री.धनंजय मुंडे यांच्या परळी येथील संपर्क कार्यालयात फोन करून मा.मंत्री श्री.धनंजय मुंडे यांना जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे कबुल केले आहे.

सदर बाबत परळी शहर पोलीस स्टेशन,जि.बीड येथे गुन्हा दाखल आहे.सदर आरोपीस पुढील तपास कामी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त गुन्हे १,श्री.सुनिल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.अजय वाघमारे,पोउनि विकास जाधव,पोलीस अंमलदार संजय भापकर,सयाजी चव्हाण,राजेंद्र लांडगे दुर्योधन गुरव यांनी केली आहे.